| | दाखल दिनांक | : | २९ | ०७ | २०२४ |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २९ | ०७ | २०२४ |
| | निकाल दिनांक | : | ०६ | ०४ | २०२६ |
| | कालावधी | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | : | ०१ | ०८ | ०८ |

**श्रीरामपुर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.१) यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी : जितेंद्र दु. जाधव)**

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३९४/२०२४** **निशाणी – ३६**

संगणकीकृत नोंदणी क्र.एम.एच.ए.एच.०६–००१७३३–२०२४

**प्रियंका सागर बनकर,**
वय : २२ महिने, धंदा : काही नाही,
द्वारा – श्री. नामदेव तुकाराम कांदळकर,
रा. भैरवनाथनगर, ता. श्रीरामपुर, जि. अहमदनगर. **अर्जदार**

**विरूध्द**

**सागर भाऊसाहेब बनकर,**
वय : २४ वर्षे, धंदा : व्यवसाय,
रा. द्वारकानगर, गजानन बिल्डींग समोर, शिर्डी, ता. राहाता, जि. अहमदनगर. **सामनेवाला**

**अर्ज** : **भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १४४ अन्वये...**

**विधिज्ञांची नांवे** : अर्जदारातर्फे : ॲड. श्री. एस. व्ही. कुलकर्णी.
सामनेवालातर्फे : ॲड. श्री. आर. ए. औताडे.

## न्यायनिर्णय

(घोषित केल्याचा दिनांक : ०६ एप्रिल, २०२६)

प्रस्तुत अर्ज सामनेवाला विरुध्द भारतीय नागरिक सुरक्षा संहिता,

२०२३ चे कलम १४४ अन्वये चालवण्यात आला.

**<u>अर्जदाराची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे</u> :-**

२) अर्जदार व सामनेवाला हे पती पत्नी असून त्यांचे लग्न दिनांक १६/०२/२०२३ रोजी मौजे श्रीरामपुर येथे संस्कृती मंगल कार्यालय, श्रीरामपुर येथे हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे मोठया थाटामाटात मानपान, संसार उपयोगी वस्तु, सोने नाणे, भेटवस्तु देवून संपन्न झालेले आहे. अर्जदार व सामनेवाला यांचे नातेसंबंध कायम आहेत. सदर विवाहासंबंधातून अर्जदार हिला सामनेवालापासुन अपत्य नाही.

३) अर्जदार हिने पुढे असे कथन केले की, लग्नानंतर अर्जदार ही सामनेवालाकडे नांदण्यासाठी सासरी शिर्डी येथे एकत्र कुटूंबात गेली. सामनेवाला याने अर्जदार हिला लग्नानंतर काही दिवस बरे नांदविले. परंतु महिन्याभरातच सामनेवाला व त्याची आई, बहिण हे अर्जदार हिला मानहानीकारक वागणुक देवु लागले. सामनेवाला हा शुल्लक शुल्लक गोष्टीवरुन अर्जदार हिला शिवीगाळ करु लागला, मारहाण करु लागला तसेच घरी उशिरा येत असे, मोबाईलवर पबजी सारखे गेम खेळून रात्रभर मोबाईलवर राहत असे. अर्जदार हिला पती म्हणुन सामनेवाला हा कुठल्याही प्रकारे शारिरीक व मानसिक सुख देत नसे. तरीही अर्जदार ही सामनेवाला याच्याकडे सर्व त्रास सहन करुन नांदत असे. सामनेवाला व त्याचे कुटूंबिय हे अर्जदार हिला मारहाण करणे, छळ करणे अशाप्रकारे वागणुक देत असे. अर्जदार हिला कुठल्याही प्रकारे सुरक्षित असे वातावरण सासरी राहिले नाही. सामनेवाला व त्याचे कुटूंबिय अर्जदार हिला उपाशीपोटी ठेवून माहेरहून चारचाकी घेण्यासाठी दोन लाख रुपये आणण्यासाठी वारंवार बोलून तगादा करुन छळ करीत असे. अर्जदार हिची सासु व नणंद यांनी अर्जदार हिचे अशक्यप्राय करुन अर्जदार हिला घरातून हाकलून लावले.

४) अर्जदार हिने पुढे असे कथन केले की, सामनेवाला याने अर्जदार हिचा स्वतःहून त्याग केला त्यामुळे अर्जदार हिला तिच्या माहेरी तिच्या आई वडीलांच्या आधारे राहावे लागत आहे. अर्जदार हिने सामनेवाला व त्याच्या कुटूंबियांची वेळोवेळी समजून काढूनही सामनेवाल्याने अर्जदार हिला नांदण्यास नेले नाही. तसेच अर्जदार हिच्या अन्न, वस्त्र निवा–याची कुठलीही व्यवस्था केली नाही. त्यामुळे अर्जदार हिला तिची उपजीविका भागविण्याकरिता नातेवाईकांकडे हात पसवण्याची वेळ आली आहे.

५) अर्जदार हिने पुढे असे कथन केले की, दिनांक १२/०६/२०२४ रोजी अर्जदार हिने सामनेवाला यास वकीलामार्फत नोटीस पाठविली. सदर नोटीसला सामनेवाला यांनी दिनांक २४/०६/२०२४ रोजी खोटया नाटया आशयाचे उत्तर पाठविले. सामनेवाला याने अर्जदार हिच्या अन्न वस्त्र निवाराची कुठल्याही प्रकारची व्यवस्था केली नाही व जाणुनबुजून त्रास देण्याच्या हेतुने सामनेवालाने अर्जदाराचा त्याग केलेला आहे.

६) अर्जदार हिने पुढे असे कथन केले की, अर्जदार ही सामनेवालाकडे नांदत असतांना वेळोवेळी सामनेवाला व त्याच्या कुटूंबियांनी अर्जदार हिला शिवीगाळ केली, मारहाण केली, पैशाची मागणी करुन शारिरीक व मानसिक त्रास दिलेला आहे. तरी देखील सामनेवाला याच्या स्वभावात व वागणुकीत बदल होवून सामनेवाला हा अर्जदार हिला व्यवस्थित नांदविल या आशेवर अर्जदार ही सामनेवाला बरोबर संसार करीत होती. शेवटी एप्रिल २०२३ मध्ये सामनेवाला याने अर्जदार हिला पैशाची मागणी करुन मारहाण करुन घरातून हाकलून दिले. त्यामुळे नाईलाजास्तव अर्जदार हिला माहेरी वडीलांकडे आश्रयितासारखे राहावे लागत आहे. अर्जदाराची प्रामाणिकपणे नांदण्याची इच्छा असून देखील सामनेवालाने अर्जदारास नांदविले नाही. तसेच खोटया आशयाची नोटीस उत्तर पाठवून अर्जदार हिच्यावर खोटे नाटे आरोप केले आहे. नोटीस

उत्तराप्रमाणे अर्जदार हिने सामनेवालाच्या कुटूंबियांना संपर्क करुन नांदण्यास घेण्याबाबत विनंती केली असता सामनेवाला व त्याच्या कुटूंबियांनी स्पष्टपणे नकार दिला. सामनेवाला अर्जदार हिला म्हणाला की, ''तु मला आवडत नाही, मला दुसरे लग्न करायचे आहे, मला घटस्फोट दे.''

७) अर्जदार हिने पुढे असे कथन केले की, अर्जदार हिला उत्पन्नाचे स्वतःचे व स्वतंत्र असे कोणतेही साधन नाही. अर्जदार ही तिचा दैनंदिन खर्च व जीवनावश्यक खर्च भागविण्यास सक्षम नाही. अर्जदार हिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने अर्जदार हिची उपासमार होत असून तिला बिकट परिस्थितीत आयुष्य जगावे लागत आहे. त्याउलट, सामनेवाला हा ट्रॅव्हलींग व पैशाची देवाण–घेवाण करण्याचा व्यवसाय करतो. त्यामुळे सामनेवाला हा त्याचे जीवन ऐशोआरामात जगत आहे. सामनेवाला यास दरमहा एक ते दीड लाख रुपये उत्पन्न मिळत असून त्याच्यावर इतर कोणीही अवलंबून नाही. सामनेवाला याची अर्जदारास नांदविण्याची इच्छा नाही. अर्जदार हिने अनेकवेळा प्रयत्न करुन देखील सामनेवाला याने अर्जदार हिला नांदविण्यास नेले नाही. दरम्यानच्या काळात सामनेवाला याने स्वतःहून अर्जदार हिचा त्याग केल्यापासून अर्जदार हिच्या अन्न वस्त्र व पोटगीची कोणतीही तजवीज केली नाही. त्यामुळे अर्जदार हिने स्वतःसाठी अन्न वस्त्र व पोटगी व निवा–यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हिने सदर अर्ज दाखल करुन अशी विनंती केली की, सामनेवाला याच्याकडून अर्जदार हिला दरमहा तीस हजार रुपये पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन मंजुर करावी.

८) सामनेवाला हा सदर अर्जात हजर होऊन त्याने निशाणी क्र.१३ वर त्यांचे म्हणणे दाखल केले. सामनेवाला याने अर्जदार क्र.१ हिने त्याच्याविरुद्ध केलेले सर्व आरोप नाकारले. सामनेवाला याने त्याची बाजु मांडण्याकरिता व अर्जदाराच्या अर्जास लेखी जबाब विस्तृतपणे वास्तविक पाहता खरी वस्तुस्थिती या सदराखाली नमुद

केलेली आहे.

९) सामनेवाला याने असे कथन केले आहे की, अर्जदार व सामनेवाला यांचे लग्न अत्यंत साध्या पध्दतीने कोणताही मानपान न स्वीकारता झाले आहे. सदर लग्न करण्याकरिता सामनेवाला याने अर्जदार हिच्या वडीलांना मदत म्हणुन रक्कम रुपये एक लाख दिले आहे. सदर लग्नानंतर अर्जदार ही सामनेवालाबरोबर सर्व साधारण एक महिला चांगली वागली. परंतु त्यानंतर अर्जदार कुरबुरी करुन सामनेवालाच्या आई व अपंग बहिणीबरोबर कोणतेही कारण नसतांना भांडणतंटा करु लागली. अर्जदार ही सामनेवालावर निर्बंध लादु लागली. अर्जदार ही सामनेवाला यास म्हणत असे की, ''तुम्ही आई व बहिणीशी बोलायचे नाही, आई व बहिणीबरोबर कोणतेही नातेसंबंध ठेवायचे नाही''. सामनेवाला हा बेरोजगार असून अर्जदार हिने त्याच्यावर लावलेल्या निर्बंधामुळे सामनेवालाची मानसिक कुचंबना होवु लागली. सामनेवाला हा अर्जदार हिला समजावून सांगत असे की, असे निर्बंध लावु नको, माझे आई व बहिणीबरोबर रक्ताचे नाते आहे, मला ते तोडायचे नाही. परंतु अर्जदार ही समजावून घेण्याऐवजी दिवसेदिवस सामनेवाला याच्या आई व बहिणीवर आरडाओरड करीत असे.

१०) सामनेवाला याने पुढे असे कथन केले आहे की, लग्नानंतर अर्जदार हिच्या वाढदिवसादिवशी सामनेवाला यास अर्जदार हिचा भाऊ सतिश व गणेश कांदळकर यांनी फोन करुन सांगितले की, आमच्या बहिणीचा वाढदिवस आहे, तिला तुम्ही मोबाईल व स्कुटर गिफट म्हणुन दया. सामनेवालाची परिस्थिती नसतांनाही बजाज फायनान्सचे कर्ज घेवून सामनेवाला याने अर्जदार हिला रक्कम रुपये ३५,०००/– किमतीचा मोबाईल घेवून दिला. परंतु त्यामध्ये अर्जदार हिचे भाऊ यांना समाधान वाटले नाही. त्यांनी सामनेवाला यास फोन करुन सांगितले की, अर्जदार हिला स्कुटर घेवून दया, नाहीतर आम्ही तिला घेवून येवु. सामनेवाला याने त्यावेळेस त्यांना सांगितले की, लगेच

स्कुटर घेण्याइतकी माझी परिस्थिती नाही. त्यावर अर्जदार हिच्या दोन्ही भावांनी सामनेवालासोबत वादविवाद सुरु केला.

११) सामनेवाला याने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार हिचे वडील अर्जदार हिला सांगत असे की, तुझ्या भावाचे लग्न करायचे आहे, मुलाचे लग्न करण्यासाठी तु तुझ्या नव–याकडून रक्कम रुपये दोन लाख घेवून ये. अर्जदार हिच्या वडीलांच्या सांगण्यावरुन अर्जदार ही सामनेवाला यास वेळोवेळी पैशाची मागणी करत असे आणि सांगत असे की, मला माझ्या भावाचे लग्न लावून पाहिजे त्याकरिता आपण मदत केली पाहिजे. सामनेवाला याची परिस्थिती ही हलाखीची असल्याने व मोलमजुरी करुन कुटूंबाची उपजीविका करत असल्याने सामनेवाला अर्जदार हिला पैशाची मदत करु शकत नसल्याने अर्जदार हिला सामनेवाला याचा राग येत असे आणि त्या कारणावरुन अर्जदार ही सामनेवाला सोबत भांडणतंटा करत असे.

१२) सामनेवाला याने पुढे असे कथन केले आहे की, सामनेवालाची बहिण सुजाता बनकर ही अपंग आहे, तिला अर्जदार ही अपमानास्पद वागणुक देत असे. अर्जदार ही सामनेवाला यास सांगत असे की, तिला आपल्या घरात ठेवु नका, तिला स्वतंत्र घर बांधून दया, आपण स्वतंत्र राहु. सामनेवाला याने अर्जदार हिला समजावून सांगितले की, तिचा सांभाळ करणे ही सामनेवाला याची जबाबदारी आहे. परंतु सदर बाब अर्जदार हिला पटत नसे. अर्जदार हिला रात्री एक दोन वाजेपर्यंत मोबाईलवर लुडो हा पैशाचा गेम खेळण्याचा छंद आहे. सामनेवाला हा अर्जदार हिला वारंवार समजावून सांगत असे. परंतु अर्जदार ही वादविवाद घालून सामनेवाला याच्याबरोबर भांडणतंटा करीत असे.

१३) सामनेवाला याने पुढे असे कथन केले आहे की, घरात किरकोळ वाद

झाला तरी अर्जदार ही काडीपेटी घेवून बसणे, चाकु घेवून बसणे, माहेरी जाण्यासाठी रिक्षा बघणे, बेडरुमचा दरवाजा लावून घेणे असे करीत असे. या सर्व बाबी सामनेवाला याने अर्जदार हिच्या वडीलांना सांगितले असता, मरणा-यांचे हात धरु शकत नाही, तिला काय करायचे ते करु दया, तिला काही बोलु नका, ती आमची खुप लाडकी आहे, तिला काय करायचे ते करु दया, नाहीतर तुम्हाला माहिती आहे आम्ही सख्खे व मावस असे अकरा जण भाऊ आहोत. अर्जदार ही दिवाळीच्या सणानिमित्त बाहेर गेली असता अर्जदार हिने तिचे वडील व भाऊ यांच्या सांगण्यावरुन सामनेवाला यास फोन करुन सांगितले की, मला तुमच्याबरोबर नांदायचे नाही, मला तुम्ही रक्कम रुपये दोन लाख दया, नाहीतर फारकत देवून टाका.

१४) सामनेवाला याने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार हिच्या हट्टापायी सामनेवाला याने आई व बहिणीचा त्याग करुन स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. आज न उदया अर्जदार हिच्या वागण्यात फरक पडेल व अर्जदार ही हट्टी सोडेल या आशेपोटी सामनेवाला हा अर्जदार हिच्याबरोबर संसार करीत असे. सामनेवाला हा नेहमीच समजुतदारीची भुमिका घेत असे. सामनेवाला हा रोजंदारीने कामाला जात असे. अर्जदार ही सामनेवालाबरोबर सतत वादविवाद करीत असे. अर्जदार हिला काम करण्याचा कंटाळा येत असे आणि त्या कारणावरुन ती सतत वाद विवाद घालत असे व आत्महत्या करण्याची धमकी देत असे. अर्जदार हिच्या मनात येईल तेव्हा ती माहेरी निघून जात असे. अर्जदार हिने सामनेवाला यास संसारसुखापासून वंचित ठेवलेले आहे.

१५) सामनेवाला याने पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला याची अर्जदार हिच्याबरोबर संसार करण्याची प्रामाणिक इच्छा असल्यामुळे त्याबाबत सामनेवाला याने अर्जदार हिला त्याच्या वकीलामार्फत दिनांक १२/०६/२०२४ रोजी नोटीस पाठविली. सदर नोटीस पाठवून सामनेवाला याने अर्जदार हिला नांदावयास

येण्याची विनंती केली. नोटीस मिळूनही अर्जदार ही नांदावयास आली नाही व त्याबाबत उत्तर दिले नाही.

१६) सामनेवाला याने पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला यास उत्पन्नाचे असे कोणतेही साधन नाही. सामनेवाला मोलमजुरी करुन त्याचे जीवन कसेबसे जगत आहे. सामनेवाला याच्यावर त्याची वयोवृध्द आई व अपंग बहिणीची जबाबदारी असून सामनेवाला व्यतिरिक्त त्यांना कोणाचाही आधार नाही. वयोवृध्द आई व बहिण यांच्या औषधोपचारावर सामनेवाला यास मोठा खर्च करावा लागत असल्याने सामनेवाला हा दैंनिक खर्च, जीवनाश्यक खर्च भागविण्यास समक्ष नाही. सामनेवाला यास उत्पन्नाचे कोणतेही साधन उपलब्ध नसल्याने सामनेवाला यास अतिशय कठीण परिस्थितीत आयुष्य जगावे लागत आहे. सामनेवाला हा अर्जदार हिच्या मागणीप्रमाणे पोटगी रक्कम देण्यास असमर्थ आहे. त्याउलट, अर्जदार हिचे डी.एम.एल.टी. चे शिक्षण पुर्ण झालेले असून ती दवाखान्यामध्ये लॅब असिस्टंट म्हणुन काम करते. त्यापासुन अर्जदार हिला दरमहा वीस ते पंचवीस हजार रुपये पगार मिळतो. अर्जदार ही ब्युटी पार्लर चालविते, मेंहदी काम करते व शिलाई काम सुध्दा करते. त्या सर्वांपासुन अर्जदार हिला दरमहा दहा ते पंधरा हजार रुपये उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदार हिला सामनेवालाकडून पोटगीची आवश्यकता व गरज नाही. सामनेवाला याने अर्जदार हिला फारकत घ्यावी या एकमेव उद्देशाने अर्जदार हिने तिच्या वडीलांच्या फुसीला बळी पडून सदरचा अर्ज केवळ सामनेवाला यास त्रास देण्याच्या उद्देशाने दाखल केलेला आहे. अर्जदार हिने स्वतःहून सामनेवालाचा त्याग केलेला आहे. त्यामुळे अर्जदार ही तिच्या मागणीप्रमाणे पोटगी मिळण्यास हक्कदार नाही. सामनेवाला याने अर्जदार हिच्या सदर अर्जास लेखी कैफियत दाखल करुन अर्जदार हिचा सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली.

१७) <u>खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष मी खालील कारणमिमांसाचे आधारे नोंदवित आहे</u> :–

| <u>अ.क्र</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १) | सामनेवाला याने अर्जदार हिचे पालन–पोषण करण्यास दुर्लक्ष केल्याचे अर्जदार हिने सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी. |
| २) | अर्जदार हिस उत्पन्नाचे पुरेसे साधन नसल्याचे अर्जदाराने सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी. |
| ३) | अर्जदार ही सामनेवालाकडुन दरमहा रु.३०,०००/– पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ४) | आदेश काय ? | **अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.** |

–: <u>कारणमिमांसा</u> :–

१८) अर्जदार हिने सदर अर्जाचे पुष्ट्यर्थ स्वतःला निशाणी क्र.१६ अन्वये तपासले. अर्जदार हिने तिची बाजु प्रबळपणे सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.२ नामे नामदेव तुकाराम कांदळकर यांची साक्ष निशाणी क्रमांक २१ खाली नोंदवून घेतली. अर्जदार हिने निशाणी क्र.२९ वर पुरावा बंद पुरसिस दाखल केली. अर्जदार क्र.१ हिने मालमत्ता आणि जबाबदारी यासंबंधी प्रतिज्ञापत्र निशाणी क्रमांक १७ वर दाखल केले. सामनेवाला याने त्याची साक्ष निशाणी क्र.३१ वर नोंदवली. सामनेवाला यांनी निशाणी क्र.३५ वर पुरावा बंद पुरसिस दाखल केली. सामनेवाला याने मालमत्ता आणि जबाबदारी यासंबंधी प्रतिज्ञापत्र निशाणी क्रमांक १५ वर दाखल केले.

<u>मुद्दा क्र.१ करीता</u> :–

१९) अर्जदार हिने तिची बाजु सिध्द करण्याकरिता सदर प्रकरणात तिच्या साक्षीचे शपथपत्र निशाणी क्रमांक १६ दाखल केले आहे. अर्जदार हिने साक्षशपथपत्रामध्ये अर्जामध्ये नमुद केलेले कथन जशास जसे नमुद केलेले आहे. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम १२५ चा उद्देश लक्षात घेता अर्जदार हिच्या पुराव्यास महत्व देणे न्यायोचित राहिल. कोणतीही स्त्री ही कोणत्याही सबळ कारणाशिवाय तिच्या पतीचे घर सोडणे शक्य नाही. सदर प्रकरणात अर्जदार हिचा उलटतपास सामनेवालातर्फे घेण्यात आला. परंतु उलटतपासादरम्यान सामनेवाला याच्या कथनास पुष्ठी देणारी एकही बाब समोर आलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिने शपथेवर सादर केलेले कथन स्वीकाहार्य असल्याचे स्पष्ट होत आहे. अर्जदार हिने तिच्या अर्जात केलेले कथन जशास जसे सरतपासणीच्या शपथपत्रामध्ये नमुद केले आहे. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम १२५ चा उद्देश लक्षात घेता अर्जदार हिच्या पुराव्यास महत्व देणे न्यायोचित राहील.

२०) सामनेवाला याने अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असल्याचे नाकारलेले नाही. तसेच सामनेवाला याने अर्जदार हिच्यासोबत त्याचे नातेसुध्दा नाकारलेले नाही. अर्जदार हिने तिच्या साक्षपुराव्यात असे नमुद केले आहे की, अर्जदार हिला कोणतेही संयुक्तिक कारण नसतांना सामनेवाला याने शारिरीक व मानसिक छळ करुन तिचा त्याग केलेला आहे. तेव्हापासुन अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे. सामनेवाला याने त्याच्या साक्षपुराव्यात असे नमुद केले आहे की, अर्जदार ही कोणत्याही सबळ कारणाशिवाय तिच्या स्वतःच्या ईच्छेने माहेरी सामनेवाला याच्यापासुन अलिप्त राहत आहे. परंतु, कोणतीही स्त्री ही कोणत्याही सबळ कारणाशिवाय आपल्या पतीचे घर सोडणे शक्य नाही. त्याचअनुषंगाने सामनेवालातर्फे अर्जदार हिचा उलटतपास घेण्यात आला परंतु उलटतपासामध्ये सामनेवाला यांनी कोणतीही सबळ बाब न्यायालयासमक्ष

आणली नाही ज्यामुळे अर्जदार ही तिच्या स्वतःच्या ईच्छेने माहेरी राहत आहे असे सिध्द होईल. त्याचप्रमाणे सदर परिस्थितीत सामनेवाला याने अर्जदार हिला कोणत्याही प्रकारे नांदविण्याचा प्रयत्न केल्याबाबत अर्जदार हिला नोटीस पाठविल्याचे नमुद केले. सदर बाब अभिलेखावर सिध्द झाली परंतु सदर नोटीसच्या अनुषंगाने सामनेवाला याने अर्जदार हिच्याविरुद्ध नांदावयास येण्याकरिता कोणताही स्वतंत्ररित्या दावा दाखल केल्याचे अभिलेखावर दिसून येत नाही. त्यामुळे सामनेवाला याने अर्जदार हिला नांदविण्यास नकार दिला हे अर्जदार हिच्या शपथपत्रामधील कथन स्वीकाहार्य असल्याचे स्पष्ट होत आहे.

२१) सामनेवाला याने जेव्हापासुन अर्जदार ही त्याच्यापासुन अलिप्त माहेरी राहत आहे. तेव्हापासुन सामनेवाला याने स्वतःहून अर्जदार हिच्यासाठी अन्न वस्त्राचे पैसे दिले अथवा त्यांच्या उत्पन्नाची सोय केली याबाबत कोणताही पुरावा हजर केलेला नाही. अर्जदार हिच्या साक्षशपथपत्रामधील कथन विचारात घेता सामनेवाला याने अर्जदार हिचा सांभाळ करण्यास नकार दिला, तिच्या उदरनिर्वाहाची सोय केली नाही किंवा दुर्लक्ष केले असे अर्जदाराने सिध्द केले आहे. अर्जदार हिच्याकडे उत्पन्नाचे साधन आहे याबाबत सामनेवाला याने कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अर्जदार हिच्या पालनपोषणाची प्राथमिक जबाबदारी ही सामनेवाला याची पती या नात्याने त्याची आहे. याशिवाय सामनेवाला याने अर्जदार हिच्या उलटतपासात अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे व सदर प्रकरण हे अर्जदार हिने सामनेवाला याच्याविरुद्ध खोटे दाखल केले आहे याबाबत कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. अर्जदार ही कोणताही कामधंदा करते याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे अर्जदार हिच्याकडे उदरनिर्वाहाकरिता साधन असून ती स्वतःचे पालनपोषण करण्यास समर्थ आहे असा कोणताही पुरावा सामनेवालातर्फे अभिलेखावर आलेला नाही आणि त्यामुळे अर्जदार ही स्वतःचे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे

असा निष्कर्ष मी नोंदवितो.

२२) अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये व साक्षशपथपत्रामध्ये असे नमुद केलेले आहे की, सामनेवाला हा ट्रॅव्हलींगचा व पैशाची देवाणघेवाण करण्याचा व्यवसाय करीत असून सदर व्यवसायामधून त्यास दरमहा एक ते दीड लाख रुपये उत्पन्न मिळवितो. तसेच सामनेवाला याच्यावर अर्जदार हिच्याशिवाय इतर कोणीही अवलंबून नाही. त्याउलट सामनेवाला याने त्याच्या लेखी जबाबामध्ये असे कथन केले आहे की, सामनेवाला याच्यावर त्याच्या कुटूंबाची जबाबदारी आहे तसेच सामनेवाला याची आई वयोवृध्द व बहीण ही अपंग असल्यामुळे त्यांची जबाबदारी सामनेवाला याच्यावर आहे. सामनेवाला हा बेरोजगार असून त्यास मिळेल ते काम करुन तो स्वतःचा व त्याची आई व बहिण यांच्या औषधोपचाराचा खर्च करीत असतो. त्यामुळे सामनेवाला हा अर्जदार हिच्या मागणीनुसार पोटगी देवु शकत नाही. त्याअनुषंगाने अर्जदार हिला उलटतपासामध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नास तिने नकारार्थी उत्तरे दिली. अर्जदार हिने सदर प्रकरणात गाव नमुना ७/१२ उतारा निशाणी क्रमांक २० दाखल केले असून सामनेवाला याच्या नावे मौजे शिर्डी, ता. राहाता येथे १ हे. ०० आर इतकी संयुक्त कुटूंबाची शेतजमीन आहे. सामनेवाला याच्याकडे शेतमीन असल्याचे अर्जदार हिने अभिलेखावर जरी सिध्द केले तरी सदर शेती व्यवसायातून सामनेवाला यास किती उत्पन्न मिळते याबाबत अर्जदार हिने कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही.

२३) सामनेवाला यांनी अर्जदार हिच्यासोबत नातेसंबंध मान्य केलेले आहे आणि त्यामुळे अर्जदार हिचे पालनपोषण करण्याची नैतिक जबाबदारी सामनेवाला याची आहे. अर्जदार ही कोणताही कामधंदा करीत नसून ती उत्पन्न मिळवून स्वतःचे पालनपोषण करीत आहे याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच

त्याउलट सामनेवाला हा याच्याकडे शेती असल्याचे अर्जदार हिने सिध्द केले आहे. अर्जदार हिने सामनेवाला याच्या एकुण उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही परंतु सामनेवाला हा काही ना काही उत्पन्न शेतीमधून घेत असल्याचे निशाणी क्रमांक २० वरुन दिसून येते. त्यामुळे सामनेवाला हा स्वतःचे व अर्जदाराचे पालनपोषण करण्यास समर्थ आहे असा निष्कर्ष मी नोंदवितो. त्यामुळे प्रकरणातील तोंडी पुरावा लक्षात घेता माझ्या मते सामनेवाला याने अर्जदार करिता रक्कम रुपये ३,०००/– प्रतिमहा अशी पोटगी देणे न्यायाच्या दृष्टीने उचित राहील. अर्जाच्या खर्चापोटी एकुण रक्कम रुपये १,०००/– सामनेवाला याने अर्जदार हिला दयावे असे माझे स्पष्ट मत आहे.

२४) अर्जाच्या कामी निष्कर्ष काढता सामनेवाला यांनी जेव्हापासुन अर्जदार ही तिच्या माहेरी सामनेवाला याच्यापासुन अलिप्त राहत आहे तेव्हापासुन अर्जदार हिच्या कपडे लत्ते, औषध पाणी तसेच अन्न वस्त्र निवारा याबाबत कोणतीही तजवीज केलेली नाही असे अभिलेखावरुन दिसून येते. पोटगीची रक्कम ही सर्वसाधारणपणे अर्ज दाखल तारखेपासुन मंजुर करावी असा संकेत आहे. त्यापेक्षा वेगळा आदेश करण्याची परिस्थिती सदर प्रकरणात दिसून येत नाही. सबब मुद्दा क्रमांक १ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.३ चे निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ च्या अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२) सामनेवाला यास आदेशित करण्यात येते की, त्याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.३,०००/– (तीन हजार रुपये मात्र) पोटगी खर्च म्हणुन अर्ज दाखल तारखेपासुन दयावे.

३) सामनेवाला यास आदेशित करण्यात येते की, सदर प्रकरणाचा खर्च म्हणुन रु.१,०००/– (एक हजार रुपये मात्र) अर्जदार हिला द्यावेत.

४) सदर न्यायनिर्णयाची प्रत अर्जदारास निःशुल्क पुरविण्यात यावी.

*(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)*

JITENDRA DUDHRAM JADHAO

Digitally signed by JITENDRA DUDHRAM JADHAO
Date: 2026.04.06 17:02:09 +0530

ठिकाण : श्रीरामपुर.
दिनांक : ०६/०४/२०२६.

**(जितेंद्र दु. जाधव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, श्रीरामपुर.

**-: प्र मा ण प त्र :-**

प्रमाणित करण्यात येते की, या पी. डी. एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : श्रीमती ऐश्वर्या आ. दहिफळे,<br>(लघुलेखक श्रेणी-३). |
| न्यायालयाचे नांव | : श्री. जितेंद्र दु. जाधव,<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.१, श्रीरामपुर. जि. अहमदनगर. |
| न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक | : ०६/०४/२०२६. |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | : ०६/०४/२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड दिनांक | : ०६/०४/२०२६. |